03 FEB 2026

पुढारी

# निरोगी आरोग्यासाठी चांगला आहार, विचार, व्यायामास प्राधान्य द्या : डॉ. संदीप पाटील

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सुदृढ व निरोगी आरोग्यासाठी चांगला आहार, विहार, विचार, व्यायाम व आचरणास प्राधान्य द्या. त्यातूनच तुमचे शरीर, कुटुंब व समाज चांगला बनेल, असा विश्वास डॉ. संदीप पाटील यांनी व्यक्त केला.

शहाजी महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजना, न्यू कॉलेज क्लस्टर अंतर्गत एकदिवसीय अग्रणी कार्यशाळेत ते बोलत होते. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण अध्यक्षस्थानी होते.

डॉ. पाटील म्हणाले, चुकीचा आहार, जंक फूड खाल्ल्याने, चांगल्या ठिकाणचा विहार टाळल्याने, व्यायामाचा अभाव असल्याने माणसाला अनेक रोग जडले आहेत. स्वतःसाठी व्यायामासाठी एक तास वेळ दिलाच पाहिजे. डॉ. शशिकांत पाटील यांनी 'व्यसनमुक्त समाज' यावर विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. डॉ. प्रसाद सनगर यांनी 'ध्यान, आहार, मानसिक आरोग्य' याविषयी मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे समन्वयक डॉ. विजय देठे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. शुभम पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. संतोष कांबळे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. आर. डी. मांडणीकर, डॉ. डी. के. वळवी, डॉ. पांडुरंग पाटील, डॉ. सुनीता राठोड, प्रबंधक आर. जे. भोसले, अधीक्षक एम. व्ही. भोसले आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : कार्यशाळेत बोलताना डॉ. संदीप पाटील.**

0 3 FEB 2026
तरूण भारत



वारणानगर : येथे कोरे फार्मसीत डॉ. बी. एम. हिर्डेकर यांचे स्वागत करताना प्राचार्या डॉ. कल्पना पाटील, सोबत डॉ. कविता ओझा, डॉ. प्रविण पाटील.

# तात्यासाहेब कोरे फार्मसीत नॅक प्रक्रियेवर परिसंवाद

प्रतिनिधी
वारणानगर

येथील तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसी येथे उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई तसेच शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या मेंटॉरमेंटी योजना : परिस- स्पर्श योजनेंतर्गत नॅक दस्तऐवजीकरण व नवीन माहिती-संप्रेषण तंत्रज्ञानाची उपयुक्तता यावरील परिसंवाद पार पडला.

परिसंवादामध्ये मेंटी महाविद्यालयांचे प्राचार्य, अंतर्गत गुणवत्ता समन्वयक व सदस्य, प्राध्यापक सहभागी झाले होते. पहिल्या सत्रामध्ये शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी, नॅक मूल्यांकन प्रक्रियेत शैक्षणिक व प्रशासकीय गुणवत्तेचे महत्त्व, अचूक व संरचित दस्तऐवजीकरणाची गरज, संस्थात्मक सुधारणा, सर्वोत्तम कार्यपद्धतीवर प्रकाश टाकला. शिवाजी विद्यापीठाच्या, संगणकशास्त्र विभागाच्या सहयोगी प्रा. डॉ. कविता एस. ओझा यांनी, दुसऱ्या सत्रात माहिती-संप्रेषण तंत्रज्ञान आधारित साधनांचा अध्यापन, नॅक दस्तऐवजीकरण व गुणवत्ता सुधारणा प्रक्रियेत प्रभावी वापर कसा करता येईल, याचे मार्गदर्शन केले.

यासाठी श्री वारणा विभाग शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आमदार विनय कोरे, वारणा विद्यापीठाचे, कुलाधिकारी एन. एच. पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. व्ही. व्ही. कारजिन्नी यांचे मार्गदर्शन लाभले. अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. कल्पना एस. पाटील होत्या. नियोजन गुणवत्ता समन्वयक डॉ. प्रविण एस. पाटील, डॉ. अमोल शेरीकर, डॉ. विनय बागल, कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली. सहभागी प्रतिनिधींनी हा परिसंवाद नॅक तयारी व संस्थात्मक गुणवत्ता वृद्धीसाठी उपयुक्त आहे.

0 3 FEB 2026

लोकमत

# चंद्रकांत पाटील यांना 'म. सु. पाटील पुरस्कार'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्यावतीने दिला जाणारा डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार मराठीतील ख्यातनाम अनुवादक, कवी व समीक्षक प्रा. चंद्रकांत पाटील यांना जाहीर झाला आहे. हा पुरस्कार २४ फेब्रुवारीला ज्येष्ठ लेखक प्रा. राजन गवस यांच्या हस्ते दिला जाणार आहे. शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी हे अध्यक्षस्थानी असतील. निवड समिती सदस्य म्हणून प्रा. एकनाथ पगार (देवळा), प्राचार्य गोविंद काजरेकर (बांदा) व प्रा. नंदकुमार मोरे (कोल्हापूर) यांनी काम पाहिले.

03 FEB 2026

पुढारी

# बदलत्या सामाजिक गरजा लक्षात घेऊन शिक्षणपद्धतीत सुधारणा करण्याची गरज

## प्रा. किरणकुमार शर्मा; विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सद्यस्थितीमध्ये बदलत्या सामाजिक गरजा लक्षात घेऊन शिक्षणपद्धतीमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा यांनी केले.

विद्यापीठ शिक्षणशास्त्र अधिविभागात प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत (पीएम.उषा) 'प्रगत अनुदेशन पद्धती' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना प्र. सोनकांबळे अध्यक्षस्थानी होत्या.

कार्यशाळेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. नितीन पाटील, नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ मुंबई येथील डॉ. महेश कोलतामे, शिक्षणशास्त्र विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथील डॉ वैभव जाधव, एमआयटी.एडीटी विद्यापीठ, पुणे येथील डॉ. प्रिया सिंग व शिवाजी विद्यापीठाच्या प्रा. डॉ. एम. पी. भिलावे यांनी 'प्रगत अनुदेशन पद्धती' या विषयावर मार्गदर्शन केले.

कार्यशाळेचे समन्वयक डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी वृत्तांत सादर केला. सहसमन्वयक म्हणून सारिका पाटील यांनी काम पाहिले. बी.एड, एम.एड (एकात्मिक) प्रशिक्षणार्थी आकांक्षा पाटील व प्रांजली भोंग यांनी सूत्रसंचालन केले. किशोर शाम यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष

0 3 FEB 2026 पुण्यनगरी 'शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'रँकिंग 'मध्ये रसायनशास्त्र, अर्थशास्त्र अधिविभाग सर्वोत्कृष्ट

## शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मूल्यमापन

कोल्हापूर : प्रतिनिधी

अधिविभागांच्या शैक्षणिक आणि संशोधकीय कामगिरीवरच समग्र विद्यापीठाच्या कामगिरीचे मूल्यमापन केले जात असते. शिवाजी विद्यापीठाच्या अधिविभागांनी 'विद्यापीठ अधिविभागीय रँकिंग फ्रेमवर्क'मध्ये अतिशय चांगल्या कामगिरीचे प्रदर्शन केले असून, यापुढील काळात ही कामगिरी सातत्याने उंचावत राहण्यासाठी विभागांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी केले.

महाराष्ट्र शासनाने, राज्यातील अकृषी सार्वजनिक विद्यापीठांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी विद्यापीठांतील विविध अधिविभागांकडून संशोधनाला चालना देणे, उपलब्ध संसाधनांचा पुरेपूर कार्यक्षम वापर करणे, कार्यपद्धतीत पारदर्शकता आणणे आणि स्पर्धात्मक वातावरण निर्माण करणे यासाठी विद्यापीठांतर्गत विभागांना मानांकन देण्याचा उपक्रम दरवर्षी राबवण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यानुसार शिवाजी विद्यापीठाने नियुक्त केलेल्या समितीमार्फत सर्व अधिविभाग, अध्यासने आणि केंद्र यांची १० व ११ डिसेंबर, २०२५ रोजी प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी केली होती. शनिवारी त्या तपासणीचा निकाल जाहीर करण्यात आला. विद्यापीठामध्ये राबवलेल्या या अधिविभागनिहाय क्रमवारी मानांकनामध्ये (यूडीआरएफ) रसायनशास्त्र अधिविभाग आणि अर्थशास्त्र अधिविभाग यांनी सर्वोत्कृष्ट कामगिरीचे प्रदर्शन केले.

या उपक्रमांतर्गत विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा आणि मानवविज्ञान, वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा यांच्या अंतर्गत प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या अधिविभागांना अनुक्रमे रुपये दहा लाख व पाच लाख आणि अध्यासने आणि केंद्रांच्या गटामध्ये प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त करणाऱ्यांना अनुक्रमे रुपये दोन लाख आणि एक लाख, तसेच प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह अशा पारितोषिकांनी गौरविण्यात आले.

यामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत रसायनशास्त्र अधिविभागाने प्रथम, तर नॅनो विज्ञान आणि बायोटेक्नॉलॉजी अधिविभागाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. इतर विद्याशाखांच्या गटात अर्थशास्त्र अधिविभागाने प्रथम आणि शिक्षणशास्त्र अधिविभागाने द्वितीय क्रमांक मिळवला. अध्यासने व केंद्र या गटामध्ये विद्यापीठ वैज्ञानिक उपकरण केंद्राने (युसिक) प्रथम आणि शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राने द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

या सर्व मानांकनप्राप्त अधिविभाग व केंद्रांना कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते आणि प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पारितोषिके वितरित करण्यात आली.

03 FEB 2026

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या अधिविभागांची यूडीआरएफमध्ये दमदार कामगिरी

प्रतिनिधी
कोल्हापूर

अधिविभागांच्या शैक्षणिक व संशोधकीय गुणवत्तेवरच संपूर्ण विद्यापीठाची कामगिरी अवलंबून असते, असे प्रतिपादन प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या अधिविभागांनी 'विद्यापीठ अधिविभागीय रँकिंग फ्रेमवर्क' (यूडीआरएफ) अंतर्गत उल्लेखनीय कामगिरी केली असून, ही गुणवत्ता भविष्यात अधिक उंचावण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या सूचनेनुसार राज्यातील अकृषि सार्वजनिक विद्यापीठांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी विद्यापीठांतर्गत अधिविभाग, अध्यासने व केंद्रांचे दरवर्षी मानांकन करण्यात येते. त्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठातील सर्व अधिविभाग, अध्यासने व केंद्रांची १० व ११ डिसेंबर २०२५ रोजी समितीमार्फत प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली. या तपासणीचा निकाल शनिवारी जाहीर करण्यात आला. या मानांकनात रसायनशास्त्र अधिविभाग आणि अर्थशास्त्र अधिविभाग यांनी सर्वोत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेत रसायनशास्त्र अधिविभाग प्रथम, तर नॅनो विज्ञान व बायोटेक्नोलॉजी अधिविभाग द्वितीय ठरला. मानवविज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखांच्या गटात अर्थशास्त्र अधिविभाग प्रथम आणि शिक्षणशास्त्र अधिविभाग द्वितीय क्रमांकावर राहिला. अध्यासने व केंद्रांच्या गटात विद्यापीठ वैज्ञानिक उपकरण केंद्र (युसिक) प्रथम ठरले. मानांकनप्राप्त अधिविभाग व केंद्रांना कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. सागर डेळेकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

03 FEB 2026
सकाळ

# रसायनशास्त्र, अर्थशास्त्र अधिविभाग सर्वोत्कृष्ट

## शिवाजी विद्यापीठस्तरीय रँकिंग : रोख पारितोषिक, प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह देऊन गौरव

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठस्तरीय रँकिंगमध्ये रसायनशास्त्र, अर्थशास्त्र अधिविभाग सर्वोत्कृष्ट ठरले आहेत. त्यांना प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते रोख पारितोषिक, प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.**

शासनाने राज्यातील अकृषि सार्वजनिक विद्यापीठांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी विद्यापीठांतर्गत विभागांना मानांकन देण्याचा उपक्रम दरवर्षी राबविण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार शिवाजी विद्यापीठाने नियुक्त केलेल्या समितीने सर्व अधिविभाग, अध्यासने आणि केंद्र यांची डिसेंबरमध्ये प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी केली. शनिवारी त्या तपासणीचा निकाल जाहीर झाला. त्यात अधिविभागनिहाय क्रमवारी मानांकनामध्ये (यू.डी.आर.एफ.) रसायनशास्त्र अधिविभाग आणि अर्थशास्त्र अधिविभाग यांनी सर्वोत्कृष्ट कामगिरी केली.

या उपक्रमांतर्गत विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा आणि मानवविज्ञान, वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा यांच्याअंतर्गत प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या अधिविभागांना अनुक्रमे रुपये दहा लाख व पाच लाखांचे पारितोषिक देण्यात आले. अध्यासने आणि केंद्रांच्या गटामध्ये प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त करणाऱ्यांना अनुक्रमे रुपये दोन लाख व एक लाख तसेच प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह अशा पारितोषिक प्रदान करण्यात आले. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत रसायानशास्त्र अधिविभागाने प्रथम, तर नॅनो विज्ञान आणि बायोटेक्नोलॉजी अधिविभागाने द्वितीय क्रमांक मिळविला. इतर विद्याशाखांच्या गटात अर्थशास्त्र अधिविभागाने प्रथम आणि शिक्षणशास्त्र अधिविभागाने द्वितीय क्रमांक मिळविला. अध्यासने व केंद्र या गटामध्ये विद्यापीठ वैज्ञानिक उपकरण केंद्राने (युसिक) प्रथम आणि विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. पारितोषक वितरणावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सागर डेळेकर उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठस्तरीय अधिविभागीय क्रमवारी मानांकन जाहीर करण्यासाठी आयोजित कार्यक्रमात बोलताना प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी. यावेळी डावीकडून डॉ. सागर डेळेकर, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

### समाजोपयोगी संशोधनावर रसायनशास्त्र विभागाचा भर

■ 'रसायनशास्त्र अधिविभागाने संशोधनाच्या माध्यमातून समाजोपयोगी व औद्योगिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण कार्यावर सातत्याने भर दिला आहे. युडीआरएफमधील मानांकनामुळे अधिविभागाच्या गुणवत्तेवर शिक्कामोर्तब झाल्याचा आनंद वाटतो', अशी प्रतिक्रिया अधिविभाग प्रमुख डॉ. संजय चव्हाण यांनी व्यक्त केली.



> अधिविभागांच्या शैक्षणिक आणि संशोधकीय कामगिरीवरच समग्र विद्यापीठाच्या कामगिरीचे मूल्यमापन केले जात असते. विद्यापीठाच्या अधिविभागांनी 'विद्यापीठ अधिविभागीय रँकिंग फ्रेमवर्क'मध्ये अतिशय चांगल्या कामगिरीचे प्रदर्शन केले आहे. यापुढील काळात ही कामगिरी सातत्याने उंचावत राहण्यासाठी विभागांनी प्रयत्न करावेत.
> **- डॉ. सुरेश गोसावी**, प्रभारी कुलगुरू

0 3 FEB 2026

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात संत रविदास जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आज संत रविदास महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. केदार मारुलकर, डॉ. तेजपाल मोहरेकर, संशोधन छात्र व विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
0 3 FEB 2026 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रसायनशास्त्र, अर्थशास्त्र अधिविभाग सर्वोत्कृष्ट

## विद्यापीठस्तरीय रँकिंग : सातत्य राखा : गोसावी

लोकमत न्यूज नेटवर्क



शिवाजी विद्यापीठस्तरीय अधिविभागीय मानांकनामध्ये विज्ञान व तंत्रज्ञानाव्यतिरिक्त अन्य विद्याशाखांतील सर्वोत्कृष्ट अधिविभागासाठीचे पारितोषिक कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते अर्थशास्त्रचे विभाग प्रमुख डॉ. ज्ञानदेव तळुले यांनी स्वीकारले.

**कोल्हापूर :** अधिविभागांच्या शैक्षणिक आणि संशोधकीय कामगिरीवरच समग्र विद्यापीठाच्या कामगिरीचे मूल्यमापन केले जात असते. शिवाजी विद्यापीठाच्या अधिविभागांनी 'विद्यापीठ अधिविभागीय रँकिंग फ्रेमवर्क'मध्ये अतिशय चांगल्या कामगिरीचे प्रदर्शन केले असून यापुढील काळात ही कामगिरी सातत्याने उंचावत राहण्यासाठी विभागांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी शनिवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाने नियुक्त केलेल्या समितीमार्फत सर्व अधिविभाग, अध्यासने आणि केंद्र यांची १० व ११ डिसेंबर २०२५ रोजी प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी करण्यात आली होती. शनिवारी त्या तपासणीचा निकाल जाहीर करण्यात आला. विद्यापीठामध्ये राबविलेल्या या विभागनिहाय क्रमवारी मानांकनामध्ये रसायनशास्त्र अधिविभाग आणि अर्थशास्त्र अधिविभाग यांनी सर्वोत्कृष्ट कामगिरीचे प्रदर्शन केले.

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेअंतर्गत रसायनशास्त्र अधिविभागाने प्रथम, तर नॅनो विज्ञान आणि बायोटेक्नॉलॉजी अधिविभागाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. इतर विद्याशाखांच्या गटात अर्थशास्त्रने प्रथम आणि शिक्षणशास्त्र अधिविभागाने द्वितीय क्रमांक मिळविला. अध्यासने व केंद्र या गटामध्ये विद्यापीठ वैज्ञानिक उपकरण केंद्राने प्रथम आणि नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राने द्वितीय क्रमांक प्राप्त केला.